# सराव प्रश्नपत्रिका–२

**विषय : इतिहास व राज्यशास्त्र** **गुण : ६०**

**इयत्ता : १० वी** **वेळ : २.३० तास**

**सूचना :**

(१) सर्व कृती/प्रश्न सोडविणे आवश्यक आहेत.

(२) उजवीकडील अंक प्रश्नांचे/कृतीचे पूर्ण गुण दर्शवतात.

(३) प्रश्न क्र. १ ते ५ इतिहास व प्रश्न क्र. ६ ते ९ राज्यशास्त्र या विषयांवरील आहेत.

(४) प्रश्न १ (अ) मध्ये संपूर्ण विधान लिहिणे आवश्यक आहे.

(५) प्रश्न १ (ब) मधील प्रत्येक संचातील पहिला घटक तसाच ठेवून दुसऱ्या घटकाची दुरूस्ती करणे अपेक्षित आहे.

(६) प्रश्न २ (अ)मधील दिलेले संकल्पना चित्र त्यात नमुना आराखड्यानुसार पेनने उत्तरपत्रिकेत तयार करणे अपेक्षित आहे.

---

**प्र. १ (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून लिहा.** **(गुण ४)**

(१) आधुनिक इतिहासलेखनाचा जनक ............ यास म्हणता येईल.

अ) व्हॉल्टेअर ब) रेने देकार्त

क) लिओपॉल्ड रांके ड) कार्ल मार्क्स

(२) ‘नॅशनल फिल्म आर्काइव्ह’ या संस्थेची मुख्य कचेरी ............... येथे आहे.

अ) दिल्ली ब) मुंबई

क) पुणे ड) नागपूर

(३) भाऊ महाजन यांनी ............... हे वर्तमानपत्र सुरू केले.

अ) दर्पण ब) प्रभाकर

क) ज्ञानोदय ड) केसरी

(४) महाबळेश्वर जवळील भिलार हे ............... गाव म्हणून प्रसिद्ध आहे.

अ) पुस्तकांचे ब) वनस्पतींचे

क) आंब्यांचे ड) किल्ल्यांचे

**(ब) पुढीलपैकी प्रत्येक गटातील चुकीची जोडी दुरुस्त करून पुन्हा लिहा.** **(गुण ४)**

(१) i) हसन निजामी – ताजुल मासिर

ii) मिन्हाज–इ–सिराज – तबाकत–इ–नासिरी

iii) झियाउद्दीन बरनी – तारीख–इ–मुबारकशाही

iv) तैमूरलंग – तुझुक–इ–तिमुरी

(२) i) कुतुबमिनार - मेहरौली
ii) गोलघुमट - विजापूर
iii) गोंदेश्वर मंदिर - अंबरनाथ
iv) ताजमहाल - आग्रा

(३) i) विष्णुदास भावे - मराठी नाटकांचे जनक
ii) बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर - अभिजात ख्याल संगीताची ओळख
iii) आनंदराव पेंटर - भारतीय बनावटीच्या सिने-कॅमेऱ्याचे निर्माते
iv) कमलाबाई मंगरूळकर - मराठीतील पहिल्या स्त्री-अभिनेत्री


(४) i) इंडियन म्युझियम - कोलकाता
ii) नॅशनल म्युझियम - दिल्ली
iii) छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय - पुणे
iv) सालारजंग म्युझियम - हैदराबाद

**प्र. २ (अ) दिलेल्या सूचनेनुसार कृती करा. (कोणतेही २) (गुण ४)**


(१) पुढील तक्ता पूर्ण करा.

| | |
|---|---|
| जेम्स मिल | द हिस्टरी ऑफ ब्रिटिश इंडिया |
| जेम्स ग्रँड डफ | ................................ |
| ................................ | द हिस्टरी ऑफ इंडिया |
| श्रीपाद अमृत डांगे | ................................ |
| ................................ | हू वेअर द शूद्राज |

(२) दूरदर्शनचा इतिहास दर्शविणारी पुढील कालरेषा पूर्ण करा.



(३) पुढील आकृतीबंध पूर्ण करा.




**प्र.२ (ब) टीपा लिहा. (कोणत्याही २) (गुण ४)**

(१) स्त्रीवादी इतिहासलेखन

(२) चित्रकथी परंपरा

(३) मार्को पोलो

**प्र. ३ (अ) पुढील विधाने सकारण स्पष्ट करा. (कोणतेही २) (गुण ६)**

(१) प्रादेशिक इतिहासलेखनाला चालना मिळाली.

(२) हेमाडपंती मंदिरे ही मंदिर वास्तूशैलीचा उत्तम नमुना आहे.

(३) कीचकवध या नाटकामुळे प्रेक्षकांच्या मनात साम्राज्यशाहीविषयी चीड निर्माण होई.

(४) आपण आपला नैसर्गिक आणि सांस्कृतिक वारसा जपला पाहिजे.

(५) विविध विषयांमधील कृतींसाठी प्रशिक्षणाची आवश्यकता असते.

**प्र.३ (ब) पुढील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही २) (गुण ६)**

(१) हेगेल यांची द्‌वंद्‌ववादी विचारसरणी स्पष्ट करा.

(२) सांस्कृतिक वारसास्थळांच्या यादीत समाविष्ट असलेल्या तुम्हांला माहीत असलेल्या कोणत्याही एका वारसास्थळाविषयी माहिती लिहा.

(३) इतिहासाचा अभ्यासक म्हणून रंगभूमी तसेच चित्रपटक्षेत्रामध्ये तुम्हांला कोणत्या संधी उपलब्ध आहेत?

**प्र. ४ दिलेल्या उताऱ्याचे वाचन करून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा. (गुण ४)**

खेळण्यांमधून इतिहास आणि तंत्रज्ञानाची प्रगती यांवर प्रकाश पडतो, धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरा समजतात. महाराष्ट्रात दिवाळीत किल्ले करण्याची मोठी परंपरा आहे. या मातीच्या किल्ल्यांवर छत्रपती शिवाजी महाराज आणि त्यांचे सहकारी यांच्या प्रतिमा ठेवतात. महाराष्ट्रातील किल्ल्यांच्या साहाय्याने घडलेल्या इतिहासाला उजाळा देण्याचाच हा एक प्रकार आहे.

इटलीतील पाँपेई शहराच्या उत्खननात एक भारतीय हस्तिदंती बाहुली सापडली. ती पहिल्या शतकातील

असावी असा इतिहासकारांचा अंदाज आहे. त्यावरून भारत आणि रोम यांच्यातील परस्पर संबंधांबद्दल अनुमान करता येते. अशा रीतीने उत्खननात मिळालेली खेळणी ही प्राचीन काळी विविध देशांमधील परस्परसंबंधांवर प्रकाश टाकू शकतात.

(१) भारतीय हस्तीदंती बाहुली कोठे सापडली आहे? (१)

(२) महाराष्ट्रातील कोणत्या परंपरेचा दिलेल्या उताऱ्यात उल्लेख केलेला आहे? (१)

(३) तुम्हांला परिचित असलेल्या खेळण्यांच्या साहाय्याने खेळल्या जाणाऱ्या कोणत्याही एका भारतीय खेळाविषयी माहिती लिहा. (२)

**प्र. ५ पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा. (कोणतेही २) (गुण ८)**

(१) इतिहासाच्या साधनांचे जतन करण्यासाठी तुम्ही कोणते उपाय सूचवाल?

(२) नियतकालिके म्हणजे काय ते सांगून तुम्हांला माहीत असलेल्या कोणत्याही एका नियतकालिकाविषयी माहिती लिहा.

(३) मैदानी खेळ व बैठे खेळ यांच्यातील फरक स्पष्ट करा.

(४) ग्रंथालये आणि अभिलेखागारे यांच्याविषयी सविस्तर माहिती लिहा.

## राज्यशास्त्र

**प्र.६ दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय लिहा. (गुण ४)**

(१) ७३वी आणि ७४वी घटना दुरूस्ती म्हणजे ........ च्या दिशेने उचललेले महत्त्वाचे पाऊल होय.

(अ) मताधिकार (ब) लोकशाही विकेंद्रीकरण

(क) सामाजिक न्याय (ड) समता

(२) मतदारसंघ निर्माण करण्याचे काम निवडणूक आयोगाची ............... समिती करते.

(अ) निवड (ब) परिसीमन

(क) मतदान (ड) वेळापत्रक

(३) मार्क्सवादी विचारसरणीवर आधारलेला पक्ष म्हणजे ............... .

(अ) भारतीय कम्युनिस्ट पक्ष (ब) भारतीय राष्ट्रीय काँग्रेस

(क) भारतीय जनता पक्ष (ड) राष्ट्रवादी काँग्रेस

(४) राजकीय प्रक्रियेमध्ये ......... वाढता सहभाग ही लोकशाही व्यवस्थेसमोरील एक गंभीर समस्या आहे.

(अ) स्त्रियांचा (ब) जनतेचा

(क) तरूणांचा (ड) गुन्हेगारांचा

**प्र.७ पुढील विधाने चूक की बरोबर ते सकारण स्पष्ट करा. (कोणतेही २) (गुण ४)**

(१) माहितीच्या अधिकारामुळे शासनाच्या कारभारातील गोपनीयता कमी झाली आहे.

(२) लोकशाहीत बहुमताला महत्त्व नसते.

(३) डॉ.राजेंद्र सिंह राणा यांना भारताचे जलपुरुष या नावाने ओळखले जाते.

**प्र.८ (अ) पुढील संकल्पना स्पष्ट करा. (कोणत्याही २) (गुण ४)**


(१) चळवळ

(२) निवडणूक आचारसंहिता


(३) भ्रष्टाचार

**(ब) दिलेल्या सूचनेनुसार कृती करा. (कोणत्याही २) (गुण ४)**


(१) भारतातील पहिल्या निवडणुकीसंदर्भातील पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा.




(२) भारतातील राष्ट्रीय पक्षाच्या स्थापनेच्या संदर्भातील पुढील कालरेषा पूर्ण करा.




(३) पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा.



**प्र.९ पुढील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही २) (गुण ४)**

(१) भारतीय नागरिकांना रोजगार मिळवण्याचा हक्क असावा याविषयी तुमचे मत व्यक्त करा.

(२) तुम्ही तुमच्या परिसरात मतदान करण्याविषयी जागृती कशी कराल?

(३) तुमच्या गावातील अथवा शहरातील राजकीय पक्ष शासन व जनता यांच्यात दुवा कसा साधतात?

(४) भारतात लोकशाहीच्या यशासाठी कोणत्या बाबी आवश्यक आहेत?